**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

आरईजी/१४२/२०२३-२४/ दिनांक १४ जुलै २०२३

## परिपत्रकः

सर्व प्राचार्य संचलित व संलग्नित महाविदयालये, मुंबई व विभाग प्रमुख (चर्चगेट / जुहू आवार) यांना परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ व महिला व बालविकास विभाग, मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्यभिषेकाच्या निमित्ताने विद्यापीठातील व महाविद्यालयातील युवतींना हिंसाचाराविरुद्ध मनोबल उंचावण्यासाठी **"राजमाता जिजाबाई युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण"** कार्यक्रमाचे आयोजन **दिनांक २० जुलै २०२३ रोजी सकाळी १०.०० ते १२.००** या दरम्यान **सर सीताराम आणि लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृह, चर्चगेट आवार येथे केले आहे.**

**सदर कार्यक्रमास ना. श्री. मंगलप्रभात लोढा, मंत्री, पर्यटन, कौशल्य,उदयोजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य, ना. श्रीमती आदिती तटकरे, मंत्री, महिला बालकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य व मा. डॉ. उज्वला चक्रदेव, कुलगुरु, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई उपस्थित राहणार आहे.**

सर्व प्राचार्य (चर्चगेट आवार) यांनी आपल्या महाविदयालयातील कमीत कमी १५० विद्यार्थीनी व जुहू आवारातील प्राचार्य यांनी १०० विद्यार्थीनींची खालील दिलेल्या लिंक नुसार नोंदणी करुन आपल्या महाविदयालयातील विद्यार्थीनींना कार्यक्रमास उपस्थित राहण्यास सांगावे.

प्राचार्य संलग्नित महाविदयालये, मुंबई यांनी ५० विद्यार्थीनींची खालील दिलेल्या लिंक नुसार नोंदणी करुन आपल्या महाविदयालयातील विद्यार्थीनींना कार्यक्रमास उपस्थित राहण्यास सांगावे.

विभाग प्रमुख (चर्चगेट व जुहू आवार) कमीत कमी यांनी १० ते १५ विद्यार्थीनींची खालील दिलेल्या लिंक नुसार नोंदणी करुन कार्यक्रमास उपस्थित राहण्यास सांगावे.

**राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम**
सर्व अधिकारी, समन्वयक, विद्यार्थी निधी, प्राचार्य यांच्या साठी **नोंदणी संदर्भात महत्वाची माहिती**

**१) संस्था नोंदणी कोणी करावी ?**

संस्थेच्या प्राचार्य /उपप्राचार्य यांनी खाली दिलेल्या लिंक वरुन Institute हा ऑप्शन निवडून Authorized Representative म्हणून स्वतःची माहिती भरावी व खाली Institute माहिती भरुन नोंदणी करावी. http://surl.li/imomt

SNDT Women's University
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

**२) संस्थेची नोंदणी कधी करावी?**
आपण ज्या वेळी एखाद्या संस्थेत कार्यक्रम घ्यायचे ठरवतो त्यावेळी त्या संस्थेची नोंदणी करणे आवश्यक आहे. तरच तो कार्यक्रम निच्छित झाला असे ग्राह्य धरले जाईल.

**३) युवतींनी नोंदणी कशी करावी?**
खाली दिलेल्या लिंक वरुन Candidate हा ऑप्शन निवडावा व स्वतःची माहिती भरुन नोंदणी करावी. http://surl.li/imonw

**४) युवतींनी नोंदणी कधी करावी?**
कार्यक्रमाआधी सहभागी होऊ इच्छिणार्या सर्व युवतींनी नोंदणी करणे आवश्यक आहे . शाळा/कॉलेज मधील शिक्षकांनी , विभागाच्या अधिकारी व विद्यार्थी निधी प्रतिनिधींनी याचा आढावा घ्यावा.

**५) शाळेत युवतीकडे मोबाईल नसतो अशावेळी नोंदणी कशी करावी?**
आपण शाळेमध्ये ( नववी-दहावी) कार्यक्रम घेत असू तर त्यावेळी युवतींकडे मोबाईल नसतो अशावेळी त्या शाळेतील दोन-चार शिक्षकांच्या मोबाईल अथवा कॉम्प्युटर वरुन त्या सहभागी होणार्या सर्व युवतींची नोंदणी करावी.

**६) नोंदणी केल्यानंतर युवतींना काय मिळेल?**
नोंदणीकृत युवतींना केंद्र सरकारचे स्वसंरक्षण प्रशिक्षण घेतल्याचे सर्टिफिकेट मिळेल तसेच पुढील ट्रेनिंग साठी त्याचा उपयोग होईल.

टेक्निकल समस्येच्या समाधानासाठी खालील हेल्पलाईन नंबर वर संपर्क करावा.
फोन नंबर - 9321235321 (सोमवार ते शुक्रवार १०:०० ते ०५:००)

**SD/-**
**(डॉ. विलास नांदवडेकर)**
**कुलसचिव**

**प्रति**

१. सर्व प्राचार्य, सर्व संचलित, श्रीमती. ना.दा.ठा.महिला विद्यापीठ, (चर्चगेट, जुहू आवार)
२. सर्व प्रायार्च संलग्नित महाविद्यालये (मंबई विभाग फक्त), श्रीमती. ना.दा.ठा.महिला विद्यापीठ, मुंबई
२. सर्व विभागप्रमुख, श्रीमती. ना.दा.ठा.महिला विद्यापीठ, चर्चगेट, जुहू आवार.